# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 14.04.2024** **वार: रविवार**

---

## डॉ आंबेडकर

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती आज पुण्यात मोठया उत्साहात साजरी करण्यात येत आहे. या निमित्ताने विविध ठिकाणी जलसा , व्याख्याने आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं असून डॉ आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केलं जात आहे. पुणे स्टेशन परिसरातील आणि कॅम्प परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यातआली होती. पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारील आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शिरूर लोकसभेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनीही अभिवादन केले. पुणे महापालिकेच्या मुख्य भवनातील डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्यास आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

‘महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्यावतीने अभिवादन मिरवणुक काढण्यात आली. क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती यांच्या वतीने पुणे रेल्वे स्टेशनजवळील डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ १० हजार किलो मिसळ आणि १ लाख नागरिकांना मोफत ताक वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ विष्णू मनोहर यांच्यासह सहका-यांनी ही मिसळ आणि ताक तयार केले होते. सावित्रीच्या लेकी महिला विकास फाउंडेशनच्यावतीने लाडू वाटप करण्यात आले.

राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक उपकार आपल्यावर असून पुढचे हजार वर्ष घटनेचा मूळ भाव बदलावा लागणार नाही असं पाटील यावेळी म्हणाले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आलं आहे. या विचार प्रबोधन पर्वाच्या तिसऱ्या दिवशी टीम डिव्हाईनच्यावतीने मतदान जनजागृती पथनाट्य सादर करण्यात आलं. तसेच यावेळी उपस्थितांनी मतदानाची शपथही घेतली. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टीजवळील मैदानात उद्यापर्यंत प्रबोधन पर्वाचे कार्यक्रम होणार आहेत.

तर झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या वतीने पुस्तक वाटप करून डॉ आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं.

## विसासंस

मानवी मूल्यांचे अधःपतन होत असताना बंधुता आणि मानवतेचा विचार दिशा देण्याचे आणि सर्वांना एकसंध ठेवण्याचे काम करतो. त्यामुळे बंधुतेचा आणि मानवतेचा हा विचार पेरत ही चळवळ विश्वव्यापी करण्यासाठी प्रयत्नशील आहे असं प्रतिपादन राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी केलं आहे. पहिल्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचा

समारोप आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वबंधुता पुरस्कार' वितरणप्रसंगी ते आज पुण्यात बोलत होते. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि साहित्यिक जयदेव गायकवाड , कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या ज्येष्ठ सदस्या नलिनी व्यंकटराव पणसा आणि भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**शहीददर्जा**

पिंपरी चिंचवड अग्निशमन दलातील जवान विशाल हनुमंत जाधव यांना शहीद हा दर्जा आणि सवलती देण्यात आल्या आहेत. विशाल जाधव यांना 2019 मध्ये एका बचाव कार्यादरम्यान वीरमरण आलं होतं. स्थायी समिती आणि महापालिका सभा यांच्याकडून मान्यता मिळाल्यानंतर राज्य शासनाकडे याविषयी पाठपुरावा करण्यात आला होता.

**बाजार**

पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आज महाराष्ट्रासह उत्तरप्रदेश, गुजरात, कर्नाटक , मध्य प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यातून 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक आणि मागणी स्थिर असल्याने बहुतांश फळभाज्यांचे भाव टिकून आहेत. पालेभाज्यांमध्ये कोथिंबिरीच्या दीड लाख तर मेथीच्या साठ हजार जुड्यांची आवक झाली. रायगड ,रत्नागिरीमधून आंब्याच्या साडेसात हजार पेट्या आवक नोंदवण्यात आली. मागणी स्थिर असल्याने आंब्याच्या भावात पेटी मागे वीस ते 30 टक्क्यांपर्यंत घसरण झाली असून चार ते आठ डझनाच्या पेटीचा भाव हजार ते बाराशे रुपयांच्या घरात आला आहे.

**अवॉर्ड**

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयातील गीता धनावडे या विद्यार्थीनीच्या An innovative device for safely cleaning of drainage line या प्रकल्पाची इन्सपायर अवॉर्ड मानकसाठी राज्यस्तरावर निवड झाली आहे. सफाई कर्मचा-यांना साफसफाई करताना जीवाला धोका पोहोचू नये असा प्रकल्पाचा विषय आहे. पुण्यातील कासार आंबोलीमधील राणी लक्ष्मीबाई शाळेमध्ये असताना तिने मंजिरी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प तयार केला होता.

**हवामान**

राज्याच्या अनेक भागात झालेल्या अवकाळी पावसामुळं अनेक प्रमुख शहरांमधील तापमानात घट झाली असली तरी आगामी आठवडाभरात पुण्यासह अनेक शहरातील तापमानाचा पारा चढलेलाच राहणार आहे. उद्यापासून पुण्यातील तापमान ४० अंशाच्या आसपास राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. पुण्यासह मध्य महाराष्टात उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्यानं नागरिकांनी उष्माघातापासून काळजी घेण्याचं आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे .

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**